# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Jaulka Rly**

**Date of Good Work done** :- **14/08/2022**

**Brief of the work done :-**

सोयाबीन चोरटे पोलिसांच्या ताब्यात ; 4.8 लाखांचा मुद्देमाल जप्त.

# सोयाबीन चोरटे गजाआड!

## ४८ लाख १ हजार ५०० किमतीचा माल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**जऊळका रेल्वे** ▪ मालेगाव तालुक्याच्या किन्हीराजा वाशिम रस्त्यावरील मैराळडोह फाट्याजवळील पुंडलिक घुगे यांच्या गट क्रमांक १४५ मधून मागील २३ जुलै रोजी रात्री चोरीला गेलेल्या सोयाबीनच्या चोरीचा पर्दाफाश करताना स्थानिक गुन्हे शाखा वाशिमने याप्रकरणी मोठी कारवाई करीत मैराळडोह गावातील चार चोरट्यांना जेरबंद करीत त्यांच्या जवळुन टाटा एस माल वाहक गाडी आणि चोरीचे सोयाबीन जप्त करण्यात आले आहे.

किन्हींराजा वाशिम मार्गावरील मैराळडोह फाट्याजवळील मैराळडोह गावातील रहिवासी पुंडलिक घुगे यांच्या गट क्रमांक १४५ च्या शेतात बांधलेल्या गोदामातून मागील २३ जुलै रोजी रात्री सोयाबीनची चोरी झाली होती. या प्रकरणी पुंडलिक घुगे यांच्या फिर्यादीवरून जउळका रेल्वे पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा क्रमांक



२८९/२०२२ नोंदवून भादंवि च्या ४६१, ३८० कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास ठाणेदार अजिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल सचिन कल्ले करीत आहेत. सोयाबीन चोरीचा हा गुन्हा अवघ्या २० दिवसांत उकलून स्थानिक गुन्हे शाखा वाशिमने सोयाबीन चोरीतील अतुल राजू मस्के वय २९ वर्ष, रोहन गजानन खंडारे वय २३ वर्ष, अमर बबन खंडारे वय २४ वर्ष, विकास गणेश कोल्हे वय २१ वर्ष सर्व राहणार मैराळडोह तालुका मालेगांव जिल्हा वाशिम या चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या सोयाबीनचे ११ कट्टे किंमत ३१५०० रुपये व एक मालवाहक टाटा वाहन किंमत ४५०००० रुपये असा एकूण ४८१५०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंग अप्पर पोलीस अधीक्षक गोरख भामरे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी स्थानिक गुन्हे शाखा वाशिमचे सोमनाथ जाधव, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद इंगळे, पोलीस हवालदार किशोर चिंचोळकर, पोलीस नाईक अमोल इंगळे, प्रवीण राऊत, पोलीस कॉन्स्टेबल संतोष.शेनकुड, चालक पोलीस कॉन्स्टेबल संदीप डाखोरे, नीलेश मिसाळ आदींनी केले आहे.(वार्ता.)

### आरोपीस पोलीस कोठडी

आरोपी व जप्त केलेला माल स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांनी पुढील कारवाईसाठी जउळका रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिला आहे. पोलिसांनी आरोपीला मालेगाव न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.